REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 7 | APRIL - 2026

# नागपूरच्या भोसले दरबारातील गणपती उत्सव : एक दृष्टिक्षेप

डॉ. रमेश धनराज जाधव
उपप्राचार्य, इतिहास विभाग प्रमुख,
आर.सी.पटेल कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,शिरपूर जि.धुळे.

**सारांश (Abstract):**



मराठा काळातील नागपूरच्या भोसले राजवटीने विदर्भाच्या राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भोसले राजे हे धार्मिक वृत्तीचे, संस्कृतीप्रेमी आणि कलांना आश्रय देणारे शासक होते. त्यांच्या काळात नागपूरमध्ये विविध सण समारंभ आणि धार्मिक उत्सव मोठ्या वैभवाने साजरे केले जात असत. त्यात प्रामुख्याने दसरा ,दिवाळी , नरकचतुर्दशी ,होळी,संक्रांत आणि गणपती उत्सव त्यामध्ये गणपती उत्सवाला विशेष स्थान प्राप्त झाले होते. हा उत्सव केवळ धार्मिक श्रद्धेचा भाग नसून सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक समन्वय, लोककलांचा विकास आणि राजकीय प्रतिष्ठेचे प्रतीक बनला होता.

भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत चालणाऱ्या या उत्सवामध्ये गणपतीची प्रतिष्ठापना, पूजाअर्चा, वेदघोष, ब्राह्मण भोजन, दानधर्म, मिरवणुका, हत्तीवरील स्वाऱ्या, तोफांची सलामी, कीर्तन, ललीत, दशावतार, नृत्य आणि गायन यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असे. विसर्जनावेळी शुक्रवार तलाव किंवा जामा तलाव येथे मोठ्या मिरवणुका काढल्या जात. उत्सवामध्ये राजघराण्यातील व्यक्ती, सरदार, मुत्सद्दी, सैनिक, कलाकार आणि सामान्य जनता मोठ्या संख्येने सहभागी होत असे.

**Key Word:** भोसले दरबार, भोसले राजवट, गणपती उत्सव.

## प्रस्तावना :

भारतीय संस्कृतीमध्ये सण आणि उत्सवांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भारत हा विविध धर्म, भाषा आणि परंपरांनी समृद्ध देश असल्यामुळे प्रत्येक प्रदेशामध्ये स्वतंत्र सांस्कृतिक वैशिष्ट्ये आढळतात. महाराष्ट्रामध्ये गणेश उपासना ही अत्यंत प्राचीन आणि लोकप्रिय परंपरा आहे. गणपती हे बुद्धी, ज्ञान, यश, समृद्धी आणि मंगलकार्यांचे अधिपती मानले जातात. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये कोणत्याही शुभकार्याची सुरुवात गणपती पूजनाने करण्याची परंपरा आहे.

भोसले राजे हे धार्मिक वृत्तीचे, संस्कृतीप्रेमी आणि कलांना आश्रय देणारे शासक होते. त्यांच्या काळात नागपूरमध्ये विविध सण समारंभ आणि धार्मिक उत्सव मोठ्या वैभवाने साजरे केले जात असत. त्यात प्रामुख्याने दसरा ,दिवाळी , नरकचतुर्दशी ,होळी,संक्रांत आणि गणपती उत्सव त्यामध्ये गणपती उत्सवाला विशेष स्थान प्राप्त झाले होते.

मराठा काळामध्ये गणपती उत्सवाला विशेष राजाश्रय मिळाला. मराठा सरदारांच्या दरबारामध्ये जसा गणपती उत्सव साजरा केला जात होता, त्याचप्रमाणे नागपूरच्या भोसले दरबारामध्येही हा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात असे. भोसले राजांनी धार्मिक परंपरा, लोककला आणि सामाजिक एकात्मता यांना प्रोत्साहन देण्यासाठी या उत्सवाचा प्रभावी उपयोग केला.

नागपूरच्या भोसले दरबारातील गणपती उत्सव हा धार्मिक श्रद्धेबरोबरच राजकीय शक्ती आणि सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक होता. उत्सवाच्या निमित्ताने राजवाड्यात विशेष सजावट, रोषणाई आणि धार्मिक विधी आयोजित केले जात. त्याचबरोबर नृत्य, गायन, कीर्तन, ललीत आणि दशावतार यांसारख्या कार्यक्रमांमुळे हा उत्सव लोकजीवनाचा अविभाज्य भाग बनला होता. भोसले काळातील समकालीन दस्तऐवजांमध्ये गणपती उत्सवाचे तपशीलवार वर्णन आढळते. या वर्णनांमधून तत्कालीन समाजजीवन, धार्मिक श्रद्धा, राजकीय वैभव आणि सांस्कृतिक वातावरण यांचे वास्तव चित्र स्पष्ट होते.

## उद्देश

१. नागपूरच्या भोसले दरबारातील गणपती उत्सवाचे ऐतिहासिक स्वरूप स्पष्ट करणे.
२. गणपती उत्सवातील धार्मिक विधी आणि परंपरा याबाबत माहिती मिळवणे.
३. उत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रम आणि लोककला याबाबत माहिती मिळवणे.
४. भोसले काळातील धार्मिक सहिष्णुता आणि सांस्कृतिक समन्वय याबाबत माहिती मिळवणे .

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून माहिती संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. उपलब्ध असणारी संदर्भ ग्रंथे त्यात प्रामुख्याने Nagpur Affairs, नागपूरचा सांस्कृतिक इतिहास, सेना धुरंधर मुधोजी भोसले, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, भारतीय इतिहास व संस्कृती त्रैमासिक या ग्रंथांचा उपयोग करण्यात आलेला आहे .

## नागपूरच्या भोसले राजवटीची पार्श्वभूमी

भोसले घराण्याने नागपूरमध्ये मराठा सत्तेचा विस्तार करून विदर्भात स्वतंत्र राजकीय आणि सांस्कृतिक केंद्र निर्माण केले. रघुजी भोसले यांच्या नेतृत्वाखाली नागपूर हे प्रशासन, व्यापार, लष्कर आणि संस्कृतीचे महत्त्वपूर्ण केंद्र बनले.

भोसले राजे धार्मिक वृत्तीचे होते त्यांनी मंदिरे, धर्मशाळा, ब्राह्मण भोजन आणि धार्मिक समारंभ यांना प्रोत्साहन दिले. धार्मिक उत्सव हे राजसत्तेच्या प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जात असल्यामुळे दरबारात उत्सव मोठ्या थाटामाटात साजरे केले जात. गणपती उत्सव हा त्यामधील सर्वात महत्त्वाचा उत्सव होता.भोसले राजांनी धार्मिक परंपरांचे पालन करत असतानाच कला आणि संस्कृतीला देखील प्रोत्साहन दिले. त्यामुळे नागपूरमध्ये संगीत, नृत्य, लोकनाट्य आणि धार्मिक कार्यक्रमांचा विकास झाला.

## गणपती उत्सवाचे धार्मिक महत्त्व

गणपती हा विघ्नहर्ता आणि मंगलकार्यांचा अधिपती मानला जातो. त्यामुळे भोसले दरबारामध्ये गणपती उत्सव अत्यंत भक्तिभावाने साजरा केला जात असे. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला शुभ मुहूर्तावर गणपतीची प्रतिष्ठापना केली जाई.

गणपतीच्या स्थापनेपूर्वी राजवाड्यात विशेष स्वच्छता आणि सजावट केली जात असे. वेदपाठी ब्राह्मणांच्या मंत्रोच्चारामध्ये गणपतीची प्रतिष्ठापना केली जाई. स्थापनेनंतर दररोज सकाळ-संध्याकाळ पूजा आणि आरती होत असे.गणपती उत्सवाच्या काळात ब्राह्मण भोजन आणि दानधर्माला विशेष महत्त्व दिले जात असे. ब्राह्मणांना दक्षिणा, वस्त्रे आणि भोजन देण्याची परंपरा होती. धार्मिक वातावरणामुळे संपूर्ण राजवाडा भक्तिमय बनत असे.

## गणपती आणण्याची शाही परंपरा

भोसले दरबारातील गणपती आणण्याची परंपरा अत्यंत भव्य आणि वैभवशाली होती. राजघराण्यातील प्रमुख सदस्य स्वतः गणपती आणण्यासाठी जात असत.प्रातःकाळी स्नान-संध्या आटोपल्यानंतर हत्ती, घोडे, जरीपटके, निशाणे, तासे आणि मोरफे यांसह मोठी मिरवणूक निघत असे. सेना साहेब सुभा, व्यंकोजी भोसले, परसोजी भोसले आणि इतर सरदार या मिरवणुकीत सहभागी होत असत.गणपतीची मूर्ती पालखीत बसवून मोठ्या थाटामाटात राजवाड्यात आणली जात असे. सैनिक, गारदी, मुत्सद्दी आणि सामान्य जनता मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी होत असे. या मिरवणुकांमधून भोसले राजसत्तेचे वैभव स्पष्टपणे दिसून येत असे.

## इ.स. १७८७ , १७८८ आणि१७९९ मधील भोसले दरबारातील गणपती उत्सव

इ.स. १७८७ मध्ये गणपती उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. त्या काळात सेना बहाद्दर यांची प्रकृती चांगली होती.या वर्षीही गणपतीचा उत्सवसाल – दरसाल प्रमाणे होऊन भाद्रपद शुद्ध नवमीला “ललीत” कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दशमीच्या दिवशी गणपती विसर्जनासाठी मोठी मिरवणूक काढण्यात आली. हत्तीवर नौबंदी आणि निशाणे लावण्यात आली होती. सेना साहेब सुभा, सेना बहाद्दर व्यंकोजी भोसले, परसोजी भोसले आणि मुत्सद्दी मंडळी या मिरवणुकीत सहभागी झाली होती.

सप्टेंबर १७८८रोजी गणपती उत्सवास प्रारंभ झाला. १७८८.मधील गणपती उत्सवामध्येही मोठ्या प्रमाणात धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. परसोजी भोसले स्वतः गणपती आणण्यासाठी गेले होते. त्यांनी गणपती आणून त्याची स्थापना करविली . त्या दिवशी मोठा पाऊस पडल्यामुळे नदीला पूर आला होता. राजे स्वतः पूर पाहण्यासाठी गेले होते.तेथे घडीभर पुराचा तमाशा पाहून आले.सायंकाळी कलावंतांचा नाच झाला. नंतर दोन प्रहरी रात्री पावेतो गणपती उत्सवाच्या दिवशी कथा झाली.या वर्णनावरून तत्कालीन उत्सवांमध्ये राजघराण्याच्या व्यक्ती प्रत्यक्ष सहभागी होत असे हे स्पष्ट होते.

इ.स. १७९९ च्या वर्षी नागपूरच्या भोसल्यांच्या दरबारात साजरा झालेल्या गणपती उत्सवाचे वर्णन कोल्ब्रूक याने दिलेले आहे. त्याने असे नमूद केले आहे की,” हरतालिकेच्या दिवशी स्त्रिया कडकडीत उपास केलेला होता.या सणाच्या आदल्या दिवशी स्त्रिया उपवास करीत असत.गणपती उत्सवाची सुरवात उपवास सोडल्यानंतर दुस-या दिवसापासून होत होती. गणपतीची मूर्ती आणल्यानंतर तिची पूजा-अर्चा करण्यात येई. गणपतीच्या मूर्तीसमोर नर्तिकाही नाच – गाण्याचा कार्यक्रम

करीत असत तसेच गायन वादनाचाही कार्यक्रम आयोजित करण्यात येई.संध्याकाळी मुसलमान नर्तिका कांचनी हयाही गणपतीच्या मुर्तीसमोर नाच –गाणे करीत असत .हा नाच गाण्याचा कार्यक्रम गणपतीच्या मूर्तीसमोर आठवडाभर चालत असे, नंतर गणपतीची मूर्ती हत्तीच्या पाठीवर विराजमान करण्यात येई आणि त्यानंतर त्या मूर्तीला एक मोठ्या तलावाकडे (जामा तलाव ) कडे नेण्यात येई आणि तेथे या मूर्तीचे विसर्जन करण्यात येई.

गणपती उत्सवाला नागपूरकर भोसले आणि नागपूरच्या सामाजिक जीवनात मोठे स्थान प्राप्त झाले होते. गणपती उत्सवाच्या दिवशी श्रीमंत लोकांच्या घरी गणपतीची स्थापना मोठ्या भक्ती भावाने करण्यात येई. त्या निमित्ताने त्यांच्या घरी वेदघोष प्रवचन, कीर्तन आणि आरास व्हायचे.

## गणपती उत्सवातील धार्मिक विधी

- गणपती वाड्यात आणल्यानंतर त्याची विशेष पूजा केली जात असे. गणपतीची महापूजा झाल्यानंतर आरती करण्यात येई. आरतीच्या वेळी तोफखान्यातून तोफा डागण्यात येत आणि गारद्यांकडून सलामी दिली जात असे.
- ब्राह्मण भोजन, दानधर्म आणि धार्मिक कार्यक्रमांना विशेष महत्त्व दिले जात असे. काही वेळा "ब्रह्मांडदान" सारख्या धार्मिक कार्यांचे आयोजन केले जाई. यावरून भोसले राजांची धार्मिक वृत्ती स्पष्ट होते.
- उत्सवाच्या काळात दररोज स्नान-संध्या, पूजा आणि आरती केली जात असे. धार्मिक विधींमुळे उत्सवाला अत्यंत पवित्र स्वरूप प्राप्त झाले होते.

## गणपती उत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रम

- गणपती उत्सव हा सांस्कृतिक कलांचा मोठा मंच होता. उत्सवाच्या काळात विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जात असत.

## नृत्य आणि गायन

- नागपूरकर भोसल्यांच्या दरबारात गणपती उत्सवाच्या काळात दिवसा कलावंतिणींचे नृत्य, गवयांचे गायन आणि वाद्यवृंदाचे कार्यक्रम आयोजित केले जात.
- कीर्तन आणि प्रवचन
- रात्री कीर्तन आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन केले जात असे. कीर्तनांमधून धार्मिक आणि नैतिक शिक्षण दिले जात होते.

## लळीत कार्यक्रम

ललीत हा धार्मिक मनोरंजनाचा कार्यक्रम म्हणून सादर करण्याची प्रथा होती.ललित सादर करणारी व्यक्ती स्वतः काही भक्तीपर गाणे रचून तो कार्यक्रम सादर करीत असे. पौराणिक देवतांचा अभिनय करून पुराणातील कथांचे सादरीकरण अभिनयाद्वारे करीत असे आणि लोकांचे मनोरंजन करण्यात येत असे.

**दशावतार:** दशावतार हा लोकनाट्य प्रकार होता ज्यामध्ये भगवान विष्णूच्या दहा अवतारांचे वर्णन केले जात असे. विशेष म्हणजे मुसलमान नर्तिका (कांचनी) देखील गणपतीसमोर नृत्य करत असत. यावरून भोसले काळातील धार्मिक सहिष्णुता आणि सांस्कृतिक समन्वय स्पष्ट होतो.

## गणपती मूर्ती आणि सजावट

- गणपतीच्या मूर्ती अत्यंत आकर्षक आणि भव्य स्वरूपाच्या असत. खणपट्ट्या वस्ताद, कृष्णा कुंभार आणि चितारी हे प्रसिद्ध कलाकार मूर्ती तयार करत असत.रघुजी भोसल्यांनी सहा फूट उंचीची गणेशमूर्ती तयार करून घेतल्याचा उल्लेख मिळतो. मूर्तीवर सोन्या-चांदीचे दागिने, रेशमी वस्त्रे आणि मौल्यवान अलंकार घातले जात.
- गणपती उत्सवाच्या काळात राजवाड्यात फुलांची सजावट, रोषणाई आणि सुंदर आरास केली जात असे. सैनिकांच्या पोशाखांमुळे आणि शस्त्रांमुळे राजदरबाराचा वैभवशाली देखावा निर्माण होत असे. अनेक लोक हा देखावा पाहण्यासाठी राजवाड्यात येत असत.

## गणपती उत्सवाचे सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व

- गणपती उत्सवामुळे समाजातील विविध घटकांमध्ये ऐक्य निर्माण होत असे. राजघराण्यातील व्यक्ती , सरदार, कलाकार, सैनिक आणि सामान्य जनता एकत्रितपणे उत्सवामध्ये सहभागी होत असत.
- उत्सवांमुळे गायन, नृत्य, कीर्तन, दशावतार आणि ललीत यांसारख्या कलांना प्रोत्साहन मिळाले. कलाकारांना राजाश्रय मिळाल्यामुळे लोककलेचा विकास झाला.
- उत्सवांमधून धार्मिक सहिष्णुतेचे दर्शनही घडते. मुसलमान नर्तिकांचा सहभाग हा त्याचा महत्त्वपूर्ण पुरावा मानला जातो.हत्तीवरील मिरवणुका, तोफांची सलामी आणि शाही समारंभ यांमधून भोसले राजसत्तेचे वैभव स्पष्ट होत असे. उत्सव हे सामाजिक आणि धार्मिक सलोखा टिकवून ठेवण्याचे प्रभावी माध्यम होते.

## गणपती विसर्जन सोहळा

गणपती विसर्जन हा उत्सवाचा सर्वात आकर्षक भाग मानला जात असे. शुक्रवार तलाव किंवा जामा तलाव येथे विसर्जन केले जात असे.गणपतीला पालखीत बसवून मिरवणूक काढली जात असे. मिरवणुकीत ढोल-ताशे, नृत्य, तोफांची सलामी आणि सैनिकांची उपस्थिती यामुळे अत्यंत उत्साहाचे वातावरण निर्माण होत असे.काही वेळा गणपतीला नावेत बसवून तलावाच्या मध्यभागी नेण्यात येत असे. विसर्जनानंतर राजघराण्यातील सदस्य तलावात फेरी मारून परत राजवाड्यात येत असत.

अशा प्रकारे नागपूरकर भोसलेंच्या दरबारात गणपती उत्सव साजरा करण्यात येत होता

## निष्कर्ष

- नागपूरच्या भोसले दरबारातील गणपती उत्सव हा धार्मिक श्रद्धा, सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक परंपरा आणि राजकीय वैभव यांचा सुंदर संगम होता. या उत्सवामध्ये धार्मिक विधींबरोबरच संगीत, नृत्य, नाटक आणि लोककलांना विशेष प्रोत्साहन मिळाले.
- गणपती उत्सवामुळे समाजामध्ये भक्तीभाव, आनंद आणि एकात्मता निर्माण झाली. राजसत्तेचे वैभव आणि जनतेशी असलेले संबंध दृढ करण्यासाठी या उत्सवांचा प्रभावी उपयोग करण्यात आला.
- आजही महाराष्ट्रातील सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये भोसले काळातील अनेक परंपरांचे प्रतिबिंब दिसून येते. त्यामुळे नागपूरच्या भोसले दरबारातील गणपती उत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो.

## संदर्भ ग्रंथ


१. Kale Y.M. Nagpur Affairs, खंड १ व २. English Record of Maratha History, Poona Residency Paper Correspondence, Bombay – पत्र क्रमांक २४२, २७२, २७९, २८०, २९५.

२. भारतीय इतिहास व संस्कृती –महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई , त्रैमासिक, ऑक्टोबर-डिसेंबर १९८९. – पृष्ठ क्र. ३९–४०.

३. जाधव रमेश धनराज -१८व्या आणि १९व्या शतकातील सातारा –कोल्हापूरचे छत्रपती आणि नागपूरचे भोसले यांचे राजदरबारातील सांस्कृतिक जीवन अंधारे भा.रा. – सेना धुरंधर मुधोजी भोसले, नागपूर- २००६

४. लांडगे देविदास गोविंद– नागपूरचा सांस्कृतिक इतिहास, नागपूर १९५४, – पृष्ठ क्र. ८५–८६.

५. राजवाडे वि.का. – मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १.